# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 29 April 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २९ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५० लाख रुपये मदतीचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय–कुटुंबातल्या एका सदस्याला सरकारी नोकरीची घोषणा
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जनता वृत्तपत्राच्या तीन खंडाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन
- मुंबई विद्यापीठाच्या लॉ ॲकेडमीला आंतरराष्ट्रीय अभिरूप न्यायालय स्पर्धेत उपविजेतेपद
- राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत मराठवाडा विभागीय पुरस्कार जाहीर

आणि

- महिलांच्या तिरंगी एकदिवसीय मालिकेत भारताचा दक्षिण अफ्रिकेवर पंधरा धावांनी विजय

****

काश्मीरच्या पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या राज्यातल्या सहा व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला आहे. आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत माहिती दिली. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

सर्वसमावेशक पीकविमा योजनेत बदल करून केंद्र सरकारच्या अनिवार्य जोखीम बाबीवर आधारित पीकविमा योजना राबवण्याचा तसंच कृषी क्षेत्रातली भांडवली गुंतवणूक वाढवण्यासाठी कृषी पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी योजना राबववण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

पी एम यशस्वी या एकछत्री योजनेअंतर्गत ओ.बी.सी., ई.बी.सी. आणि डी.एन.टी. प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांना, मॅट्रीकपूर्व तसंच मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासननं २०२१ ते २०२६ या वर्षांकरता निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र राज्यात जहाजबांधणी, जहाजदुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर सुविधा विकसित करण्याबाबतच्या धोरणाला मान्यता, पुणे जिल्ह्यातल्या टेमघर प्रकल्पासाठी सुमारे चारशे अठ्ठ्याऐंशी कोटी रुपये सुधारित खर्चाला मान्यता, विशेष मागास प्रवर्गातल्या गोवारी समाजाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबवणं, इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसंच वसंतराव नाईक विमुक्त जाती आणि भटक्या जमाती विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा दहा लाख रुपयांवरून पंधरा लाख रुपये करणं, तसंच ॲप आधारित वाहनांसाठी समुच्चयक धोरणालाही राज्यमंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध नियमातल्या तरतुदीत सुधारणा करत भिक्षागृहातल्या व्यक्तींना दररोज पाच ऐवजी चाळीस रुपये देण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२५, आज मंत्रिमंडळानं मंजूर केलं. याबाबत मुख्यमंत्र्यांनी अधिक माहिती दिली.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

********

राज्याला ऊर्जा संपन्न बनवण्यासाठी हरित ऊर्जा निर्मितीसह उदंचन जलविद्युत प्रकल्पांवर राज्य शासनानं लक्ष केंद्रित केलं असून, राज्य ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेनं अग्रेसर आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. आज मंत्रालयात जलसंपदा विभागासोबत, महाजेनको, महाजेनको रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड आणि अवादा ॲक्वा बॅटरीज प्रायव्हेट लिमिटेड, या तीन कंपन्यांचे सामंजस्य करार झाले, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. आजच्या या सामंजस्य करारांमुळे राज्यात एकूण नऊ उदंचन जलविद्युत प्रकल्पांमध्ये ५७ हजार

२६० कोटी इतकी गुंतवणूक होणार आहे. ८ हजार ९०५ मेगावॅट क्षमतेच्या या उदंचन प्रकल्पांमधून ९ हजार २०० रोजगार निर्माण होणार आहेत.

****

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जनता वृत्तपत्राच्या तीन खंडाचं आज मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आलं. खंड क्रमांक ७, ८ आणि ९ या तीन खंडासह इंग्रजी खंड ४ चं मराठी भाषांतर आणि इंग्रजी खंड २ च्या नव्या आवृत्तीचं प्रकाशनही आज करण्यात आलं.

****

थॅलेसेमिया आजारापासून महाराष्ट्र मुक्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ‘एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे’ हे अभियान येत्या आठ मे पासून सुरू करण्यात येत आहे. या अभियानाच्या पहिल्या दिवशी राज्यातील सर्व थॅलेसेमिया ग्रस्त रुग्णांना दिव्यांग प्रमाणपत्र देण्याच्या अशा सूचना सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिल्या आहेत. त्या आज यासंदर्भातल्या राज्यस्तरीय आढावा बैठकीत बोलत होत्या. या आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी आशा सेविकांना प्रशिक्षण द्यावं, तसंच याविषयी केलेल्या कामाचा नियमित आढावा घेण्यात यावा, आदी सूचनाही बोर्डीकर यांनी दिल्या आहेत.

****

हज यात्रेसाठी एकूण साडे पाचशे भाविकांचे दोन जत्थे आज रवाना झाले. लखनऊ आणि हैदराबाद इथून दोन विमानांतून या भाविकांनी जेद्दाहकडे प्रस्थान केलं. या सर्व भाविकांना केंद्रीय अल्पसंख्यक कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. हज यात्रा सुरळीतपणे पार पडावी, हे सुनिश्चित करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं रिजिजू यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

मुंबई विद्यापीठाच्या लॉ अॅकेडमीनं आंतरराष्ट्रीय अभिरूप न्यायालय स्पर्धेत उपविजेतेपद मिळवलं आहे. स्वित्झर्लंडमधल्या जिनेव्हा इथे यावर्षीच्या तेवीस ते पंचवीस एप्रिलदरम्यान ही स्पर्धा घेण्यात आली. मुंबई विद्यापीठाच्या लॉ अकॅडमीच्या आर्या गौतम आणि संस्कृती शर्मा यांनी ‘जनरेटिव्ह एआय आणि कॉपीराइट कायदा’ या विषयावर उत्तम सादरीकरण करत हे उपविजेतेपद पटकावलं.

****

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय आणि कन्नड उपविभागीय अधिकारी कार्यालय यांना सन २०२४–२५ साठी पारितोषिकं जाहीर झाली आहेत. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज ही पारितोषिकं जाहीर केली. छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयास आधुनिक संकल्पना या श्रेणीत, नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाला ऑनलाईन पोर्टल मार्फत कर्मचारी बदल्या तर कन्नड उपविभागीय अधिकारी कार्यालयास आधुनिक संकल्पना तसंच व्यवस्थापन या श्रेणीत पुरस्कार जाहीर झाले आहेत.

****

श्रीलंकेत सुरू असलेल्या महिलांच्या तिरंगी एकदिवसीय मालिकेत आज भारतीय महिला संघानं दक्षिण अफ्रिका महिला संघाचा पंधरा धावांनी पराभव केला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेत, सहा बाद २७६ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल खेळण्यास उतरलेला दक्षिण अफ्रिकेचा संघ पन्नास षटकांत २६१ धावांवर सर्वबाद झाला. पाच बळी टिपणारी स्नेह राणा प्लेयर ऑफ द मॅच पुरस्काराची मानकरी ठरली. याआधी रविवारी यजमान श्रीलंका महिला संघासोबतचा सामना देखील भारतीय महिला संघानं जिंकला आहे.

दरम्यान, आयपीएल क्रिकेट मध्ये आज दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना होणार आहे. दिल्लीच्या अरूण जेटली मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजेपासून सामना खेळवला जाणार आहे.

****

आज देशासह राज्यभरात परशुराम जयंती साजरी होत आहे. छत्रपती संभाजीनगर इथे ब्राह्मण समाज समन्वय समितीतर्फे भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त आज सकाळी शहरातल्या क्रांती चौकापासून औरंगपुऱ्यातल्या परशुराम स्तंभापर्यंत फेरी काढण्यात आली. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीनं आज या उत्सवाच्या औचित्यानं रुग्णवाहिकेचं लोकार्पण करण्यात येणार आहे.

बीड जिल्ह्यातल्या पाटोदा शहराचं ग्रामदैवत भामेश्वर मंदिर इथे दरवर्षी प्रमाणे यंदाही भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला.

****

लातूर इथं उभारण्यात येत असलेल्या ‘सारथी’ संस्थेचं विभागीय कार्यालय, मुला–मुलींची वसतीगृहं आणि इतर उपक्रमाच्या इमारत बांधकामांची आमदार अमित

देशमुख यांनी आज पाहणी केली. वसतीगृहाच्या नियोजित १२ पैकी ७ व्या मजल्याचं काम सध्या सुरू आहे. कामाचा दर्जा राखून जून २०२६ पूर्वी प्रकल्प पूर्णत्वास न्यावा, अशी सूचना आमदार देशमुख यांनी संबंधितांना केली.

****

राज्यात सामाजिक सौहार्द आणि महाराष्ट्र धर्म वाढीस लागावा या उद्देशासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने सद्भावना यात्रांचं आयोजन केलं आहे. त्यानुसार येत्या १ मे रोजी बीड जिल्ह्यात परळीमध्ये प्रदेश काँग्रेसच्या वतीने सद्भावना संकल्प करण्यात येणार आहे.

****

हवामान

राज्यात आज सर्वाधिक ४४ पूर्णांक पाच अंश सेल्सिअस तापमान अकोला इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात धाराशिव इथं ४२ अंश तर परभणी आणि छत्रपती संभाजीनगर इथं साडे ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****